# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. २७/०३/२००८
## (दि. ११-३-२००८ रोजीची तहकूब सभा)

**लालबहाद्दुर शास्त्री स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला,**
दि. २७/०३/२००८

आज गुरुवार दि. २७/०३/२००८ रोजी दि. ११/०३/२००८ रोजीची स्थायी समितीची तहकुब सभा सुचना क्र. १२ दि. ०३/०३/२००८ रोजीच्या विषयपत्रिकेवरिल विषयांवर विचार विनिमय करण्याकरिता लाल बहाद्दुर शास्त्री, स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, मुख्य कार्यालय येथे सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आलेली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी **मा. सभापती, श्री. मॉरस जोसेफ रॉड्रिक्स** हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. मॉरस जोसेफ रॉड्रिक्स | -- | सभापती |
| २) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | -- | सदस्य |
| ३) | ॲड. एस.ए. खान | -- | सदस्य |
| ४) | श्री. मिलन वसंत म्हात्रे | -- | सदस्य |
| ५) | सौ. शानु गोहिल | -- | सदस्या |
| ६) | सौ. सुनिता कैलास पाटील | -- | सदस्या |
| ७) | सौ. नयना गजानन म्हात्रे | -- | सदस्या |
| ८) | श्री. गणेश गोपाळ शेटटी | -- | सदस्य |
| ९) | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | -- | सदस्य |
| १०) | श्री. शरद केशव पाटील | -- | सदस्य |
| ११) | श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल | -- | सदस्य |
| १२) | श्री. प्रकाश पांडुरंग ठाकूर | -- | सदस्य |
| १३) | सौ. ज्योत्स्ना हसनाळे | -- | सदस्या |
| १४) | श्री. प्रशांत भगवंतराव पालांडे | -- | सदस्य |
| १५) | श्री. टेरी पॉल परेरा | -- | सदस्य |
| १६) | श्री. राजु भोईर | -- | सदस्य |

**मा. सभापती :-**

आजच्या सभेला उपस्थित असलेले सर्व सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, मनपा अधिकारी तथा कर्मचारी वर्ग यांचे हार्दिक स्वागत करुन ही सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडण्यास सहकार्य करावे अशी मी विनंती करतो आणि सभेला सुरुवात करावी अशी मी नगरसचिवांना सुचना करतो.

**नगरसचिव :-**

या परिपत्रकाव्दारे आपणांस कळविण्यांत येते की, मा. स्थायी समिती सभा मंगळवार दि. ११/०३/२००८ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता आयोजित करण्यांत आलेली होती. सदर सभा तहकूब करण्यांत आल्याने विषयपत्रिकेवरील प्रलंबित विषय क्र. ६० ते ६२ या विषयांवर चर्चा करण्यासाठी ही सभा गुरुवार दि. २७/३/२००८ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लालबहादूर शास्त्री सभागृहात आयोजित करण्यांत येत आहे. मागिल सभेचे इतिवृत्तांत प्रकरण क्र. ६०, दि. २७/१२/२००७ व दि. ०३/०१/२००८ रोजीच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

त्याच्यामध्ये आपण डबल एन्ट्री सिस्टमचा जो ठराव मांडला होता. तो ठराव त्याच्यामध्ये घेतला नाही.

**नगरसचिव :-**

जे नविन प्रोसिडींग दिले त्याच्यात आलेला आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

पण तो ठराव आलेला नाही. तुम्ही घेतला का?

**नगरसचिव :-**

करेक्शन करुन आलेला आहे.,

**एस. ए. खान :-**

प्रकरण क्र. ६०, दि. २७/१२/२००७ व दि. ०३/०१/२००८ रोजीच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे. दि. २७/१२/२००७ व दि. ०३/०१/२००८ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्तीसह व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे, असा मी ठराव मांडत आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

श्री. पानपट्टे साहेब मागे आपला असा विषय झाला होता की, तुम्ही पार्कींगचा विषय आणणार होते आणि श्री. खतगांवकर साहेबांनी रुलिंग दिले होते की तो विषय परत आणा. तो तुम्ही का आणला नाही? विषय आणायला तुम्हांला काही प्रॉब्लेम आहे का?

**एस. एस. पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

येत्या स्टॅण्डींगमध्ये तो मी आणतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्हांला आणायची इच्छा आहे की नाही?

**एस. एस. पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

आणायची इच्छा आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही चांगले अधिकारी आहात. आम्ही तुमचा मान ठेवतो. पण तुम्ही जाणून बुजून मिस्टेक करता का कसे?

**एस. एस. पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

विषय आणायचे असे आहे की, त्याला रितसर परवागनी दिलेली आहे. विषय फक्त माहितीसाठी देण्यात येईल. त्याला ऑलरेडी टेंडर दिलेले आहे. त्याला तीन वर्षाची मुदत आहे. तुम्हांला फक्त माहितीसाठी विषय आणायचा आहे. जी वस्तुस्थिती आहे ती तुमच्या माहितीसाठी मी आणणार.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही मिस करता. तुम्ही मागे सांगितले होते की हा विषय चुकीचा असेल तर आपण परत ठराव करु आणि तो विषय परत रितसर आणू.

**एस. एस. पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

ब्रिजच्या खाली जो बोर्ड आहे त्या संदर्भात.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

त्या ठिकाणी जे बोर्ड उभे राहिले आहेत. त्या संदर्भात २००३ ला ठराव झाला होता त्याचे ॲग्रीमेंट त्याचे वर्क, त्याचे वर्क ऑर्डर...

**एस. एस. पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

त्याची संपूर्ण कार्यवाही पी.डब्यू.डी. विभागाने केलेली आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही म्हटले होते की हा विषय आपण परत आणू या. आणि साहेब, तुम्ही स्वतः रुलिंग दिले होते. तर तो विषय अजूनपर्यंत आलेला नाही. तुम्ही सांगितले होते की, मी तो पुढच्या मिटींगला आणणार.

**एस. एस. पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

त्याची कार्यवाही पी.डब्ल्यू.डी. ने केलेली आहे. त्याला रितसर परवानगी दिलेली आहे. मी तुम्हांला माहितीसाठी देतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

त्यांनी स्पेसिफीकेशनसाठी काम केले नाही. आणि तुम्ही त्याला लगेच ॲक्सेप्ट केले?

**एस. एस. पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

मी पी.डब्ल्यू.डी. कडून तसा रितसर अहवाल मागवतो आणि नंतर तुम्हांला माहिती देतो.

**प्रकरण क्र. ६० :-**

दि. २७/१२/२००७ व दि. ०३/०१/२००८ रोजीच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ४७ :-**

दि. २७/१२/२००७ व दि. ०३/०१/२००८ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्तीसह व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. एस. ए. खान. अनुमोदक :- श्री. तुळशीदास म्हात्रे.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ६१, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या पथकर (एस्कॉर्ट) नाक्यावर कामावर असताना मोटार अपघात झालेल्या स्थायी कर्मचारी (शिपाई) यांचे हॉस्पिटलचे बिल अदा करणेबाबत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब तो विषय मा. महासभेत झाला ना?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मा. सभापती साहेबांना माझी प्रशासनाकडून विनंती आहे की, हा विषय मा. महासभेने मंजूर केलेला असल्यामुळे आत्ता इथे वगळायला काही हरकत नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, त्याच्याबरोबर आणखीन एक मुद्दा असा आहे की, आपण कर्मचाऱ्यांना जी २७०० रुपयांची मेडीक्लेम पॉलिसी देणार होतो. त्याचे काय झाले?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मेडीक्लेमसाठी कर्मचाऱ्यांनी मेडीक्लेम पॉलिसी काढावी अशी मा. महासभेलासुद्धा अपेक्षा होती आणि त्या ठरावामध्ये सुद्धा तसे नमुद आहे आणि त्या अनुषंगाने आम्ही सर्व कर्मचाऱ्यांना तसे अवगत केलेले आहे. काही कर्मचाऱ्यांनी मेडीक्लेम काढल्याचे आमच्याकडे कळवलेले आहे. त्यांना ३१ मार्च पूर्वी रक्कम वितरीत केली जाईल. काही कर्मचारी संघटनांची मागणी अशी आहे की, या वर्षाची रक्कम आम्हांला वितरीत करावी आणि पुढच्या वर्षी आम्ही मेडीक्लेम काढू. तर तो विषय आम्ही मा. आयुक्तांकडे सादर केलेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

त्याच्यामध्ये तुम्ही कर्मचाऱ्यांना महानगरपालिकेतर्फे नियमात असलेली मदत करता. त्यांचे लोकप्रतिनिधी काही बोलतील ते चालत नाही. समजा आज मी लोकप्रतिनिधी आहे. तुमच्याकडे कमिटमेंट केली, की तुम्ही आम्हांला कॅश द्या. पुढच्या आठवडयात किंवा पुढच्या महिन्यात करु आणि आज समजा दहा कर्मचाऱ्यांना काहीतरी झाले. आणि त्यांना, आत्ता ह्या चुरीचा पावणे तीन लाखाचा भुर्दंड आपल्याला पडला. ती युनियन ते करणार आहे का? नाही. युनियनने तुम्हांला सांगितले की आम्ही करु. कशासाठी? तुम्ही निर्णय घ्या. लेबर कमिशनरच्या अनुषंगाने किंवा तुमच्या लेबर कोर्टात जे काही न्यायनिवाडे झाले त्याच्या हिशोबाने कर्मचाऱ्यांना किती रुपयाचा इश्यूरन्स क्लेम तुम्ही देणार, ही तुमची कक्षा आहे. तुम्ही जर चुकीचे बोलत असाल तर त्या युनियनच्या पुढाऱ्याने जरुर बोलावे. पण नियमात कायद्यातील तरतुदीनुसार तुम्ही त्यांना एजंट आणून महानगरपालिकेने बसवायचा. उद्या ते कुठल्याही कंपनीचे काढून आणतील. आत्ता आय.सी.आय.सी.आय. बँकेची लोनची किती लफडी चालली आहेत. शेवटी त्या कर्मचाऱ्याचा जो लॉस होईल किंवा त्याच्यावर फिजीकली जो बॅड इफेक्ट पडेल. त्याचे भुगतान तुम्हांला करावे लागणार आहे. त्याचा एक एजंट येईल तो बोलणार की, तुम्ही मला पंधराशे रुपये द्या. मी तुम्हांला दहा हजार क्लेम देईन. पण उद्या काय झाले की, ते पाचच देणार म्हणून शासनाच्या ज्या ऑफिशिअल्स आहेत. त्यांना तुम्ही कॉल करा. त्यांना तुम्ही बल्कमध्ये द्या. त्याचे बेनिफिट त्या कर्मचाऱ्यांना आहे. ह्या फायर ब्रिगेडच्या लोकांना गेल्या पाच सहा वर्षापासून आम्ही ओरडतो की, तुम्ही एक ऑफिशिएल एजंट आणा. न्यू इंडिया इश्यूरन्सचा तुम्ही घेउन या. आम्ही तो आणला पण होता. आणि त्यांच्या चांगल्या चांगल्या स्किम आहेत. जेवढे वर्कर जास्त तेवढे इन्स्टॉलमेंट कमी आणि बेनिफिट जास्त. त्याच्यामध्ये तो स्वतः, त्याची पत्नी, त्याची बहीण, त्याची आई हे सगळे कोट होतात. कमीत कमी २५,०००/- ची पॉलिसी होती. तर ते कोणी ॲडॉप्ट केलेच नाही. आज इकडे दर वेळेला कर्मचाऱ्यांचे अमुक एवढे द्यायचे. आत्ता मला सांगा, जवळ जवळ तीन लाखामध्ये तुम्ही किती कर्मचाऱ्यांना इन्स्टॉल केले असते. एकाचा तुम्ही दिड हजार, अडीच हजार, तीन हजार पकडा. म्हणजे आज जवळ जवळ शंभर लोकांची पॉलिसी क्लेम झाली असती म्हणजे समजा मी लेबर युनियनचा अध्यक्ष आहे. मी उद्या तुमच्याकडे काहीतरी कमिटमेंट करतो. तुम्ही त्यांना लेखी कळवले पाहिजे की, आमची ही पॉलिसी आहे. आणि तुम्हांला तसे द्यावे लागणार आणि तुम्ही ते घेतले पाहिजे कारण कायद्यामध्ये ती तरतुद आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तसे कळवले जाईल.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही निर्णय घ्या. दोन आठवडयांत दहा जण आले त्यांनी सांगितले. आणखीन पन्नास आले त्यांनी सहा आठवडयानंतर सांगितले. ते चालणार नाही. तुम्ही तुमच्या क्लेमची पॉलिसी हातात दिली की, तुमची उद्याची जिम्मेदारी ज्या दिवशी पॉलिसी हातात पडली त्यादिवशी तुमचा क्लेम त्यांना लागू झाला.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे साहेब मी मा. आयुक्तांना सांगतो की, या १५ एप्रिलच्या अगोदर सर्व कर्मचाऱ्यांची इन्श्युरन्स पॉलिसी करावी. पंधरा तारखेनंतर आम्ही कोणाचेही क्लेम मा. स्टॅण्डींगमध्ये किंवा मा. महासभेमध्ये पास करणार नाही.

**मिलन म्हात्रे :-**

चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांपासून प्लस तुमचे साफसफाईचे ठेक्याचे मजूर आहेत. साफसफाई करताना रस्त्यावर त्यांनाही उडवले जाते.

**मा. सभापती :-**

पण आत्ता गेल्यावर्षीचे पैसे त्यांना देणे भाग आहे.

**मिलन म्हात्रे :-**

द्या. पण ते पैसे देणे म्हणजे काय? युनियनचे पदाधिकारी बोलतात की, आम्हांला कॅश द्या. मा. महापौरांच्या केबिनमध्ये हा वाद झाला. म्हणजे त्या कर्मचाऱ्याने उद्या कॅश नेली आणि ती कॅश वापरली, क्लेम काढला नाही. मग तुम्ही भांडतच राहणार ना.

**मा. सभापती :-**

गेल्या वर्षी ज्यांचे बाकी आहेत. त्यांच्याबद्दलच सांगतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

पण साहेब त्यांनी मेडीक्लेम काढलाच नसेल मग आपण पैसे कशाबद्दल द्यायचे? त्यांची पावती आपण बघितली पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

पावती कशाला? माझे म्हणणे आहे की, तुम्ही त्यांना पॉलिसी इश्यू करा. त्यांना पॉलिसी द्या. पैशांच्या भानगडीत पडू नका.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

श्री. खतगांवकर साहेब माझे असे सजेशन आहे की, सध्या कॉम्पीटीशनचा जमाना आला. शासनाच्या ज्या निरनिराळ्या इन्श्युरन्स कंपन्या आहेत. त्यांना तुम्ही जर कॉल केले तर तुम्हांला कॉम्पिटेटीव्ह रेटमध्ये कमी प्रिमियममध्ये मॅक्झीमम बेनिफिट मिळेल. आणि आपण जर महानगरपालिकेचे एकत्रित काढले तर आपला पण फायदा होईल आणि कर्मचाऱ्यांचा पण फायदा होईल.

**मिलन म्हात्रे :-**

त्याच्यात सगळ्यांचा इंटेशन क्लिअर होतो.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

महापालिकेच्या मान्यतेप्रमाणे सर्व विभागप्रमुखांना ही बाब लेखी अवगत करण्यांत आलेली आहे की, त्यांच्या अधिपत्याखाली असलेले सर्व कर्मचारी यांचे त्यांनी प्रबोधन करावे आणि त्यांना कंम्प्लसरी इन्श्युरन्स काढण्यासाठी हेल्प करावे आणि मा. महापौरांकडे सुद्धा आम्ही बैठक घेतल्या. सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे साहेब बोलल्याप्रमाणे ज्या रेकग्नाईज इन्श्युरन्स कंपन्या आहेत. त्यांना आम्ही बोलावले. त्यांची स्किम आम्ही कर्मचाऱ्यांना समजावून सांगितली. त्याची महापालिकेने जाईंटली करण्यापेक्षा कर्मचारी हे स्वतः करु शकतात.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही करायची. ते लोक करणार नाहीत. साहेब त्यांच्यात वाद झाले आणि ते तिकडूनच उठून गेले. मी तुम्हांला परत सांगतो. तुम्ही सेटल केले, बसले, चर्चा झाली. एखादा कर्मचारी खाली गेला आणि त्याचे काहीतरी झाले, काही होते. काहीच सांगता येत नाही तर त्याची जिम्मेदारी कोणाची?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपल्या सुचनेप्रमाणे आम्ही त्यांना लेखी कळवलेले आहे. जे इन्श्यूरन्स काढतील त्यांना ही रक्कम अदा केली जाईल. नाहीतर रक्कम देणार नाही.

**मिलन म्हात्रे :-**

म्हणजे तुम्ही तुमची जिम्मेदारी टाळता असे होते. एकीकडे तुम्ही ठेकेदाराला कायदे शिकवता. तुम्ही ठेकेदाराला सांगणार की, तुझ्याकडे जे दोन अडीचशे मजूर आहेत. त्याचे इन्श्यूरन्स तू काढले पाहिजे. मग याचे मालक कोण? ह्या महानगरपालिकेची जी आस्थापना आहे. त्याचे मालक तुम्ही आहात, हे लक्षात घ्या. तुम्ही त्यांना, जो कोणी एजंट येईल तो बिहाफ ऑफ यू. म्हणजे महानगरपालिकेच्या वतीने त्याने सगळे करुन तुम्हांला त्यांना ते द्यायचे आहे. एकीकडे तुम्हीच त्या ठेकेदाराला अडवता की, नियमानुसार तुम्ही त्यांचे सगळे काढले पाहिजे. हा नियम आहे तो नियम आहे. मग तुम्ही सर्व का करत नाही. तुमचे आयडेंटी कार्ड तुम्ही इश्यू केली. पंचिंग कार्ड तुम्ही इश्यू केले. सगळे तुम्ही करता. त्यांचे सर्व्हिस रेकॉर्डस वगैरे तुम्ही ठेवता. मग

पॉलिसी करिता तू हे कर ते तू कर. कशासाठी? तुम्ही त्यातली प्रिफर करा. एजन्सी कुठचीही असेल. महापालिका म्हणून तुम्हाला एक निराळा ऑनर मिळणार. आणि मी एक कर्मचारी म्हणून गेलो तर मी डिसऑनर होणार, हे लक्षात घ्या. तो मला सफाई कामागाराचा दर्जा देणार. महापालिकेचा कर्मचारी म्हणून दर्जा मिळणार नाही. हा सायकॉलॉजिकल इफेक्ट असतो. तो इन्श्युरन्स कंपनीतला अधिकारी त्याला बसायला पण जागा देणार नाही हे लक्षात घ्या. तुम्ही डी.एम.सी. गेले तर तो जनरल मॅनेजर तुमच्याशी बसून चर्चा करणार. त्याच्या निरनिराळ्या स्किम देणार आणि त्याचा बेनिफिट त्या कर्मचाऱ्याला होणार म्हणून तुमच्या वतीने तुम्ही काय करणार ते सांगा. कर्मचाऱ्यांनी काय करायचे ते आम्हांला माहिती नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

आपण सामुहिक कर्मचाऱ्याला बंधनकारक करु शकत नाही की तू याच्यातच काढ. कर्मचाऱ्याची विल असेल की आम्ही सामुहिक काढावी. तर आम्हीसुद्धा काढू. काही प्रॉब्लेम नाही. तो त्यांचा विषय आहे.

**मिलन म्हात्रे :-**

त्याच्यात ऐच्छिक नाही. उद्या मी बोलेन की मला एक लाख रुपयाचां विमा पाहिजे. त्याच्यात ऐच्छिक कसले आले?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

जी कंपनी निवडायची त्याच्याबद्दल बोलतो. एखाद्याला वाटले की मी बजाज अलायन्सचे घेईन.

**मिलन म्हात्रे :-**

निरनिराळ्या कंपन्या आल्या आहेत. त्या सगळ्यांना कॉल करा. त्याच्यातली सगळ्यात चांगली कंपनी कोणती ते तुम्ही ठरवा. शेवटी चार कंपन्यांपैकी चांगली कंपनी हा डिसीजन पॉलिसीवर असतो. पण एका कर्मचाऱ्याने आज काढला. उद्या काढला नाही. मी बोलतो ते परत एकदा सांगतो आणि काय करायचे आहे ते शेवटी तुम्ही करा. आम्ही जास्त बोलणार नाही. कर्मचारी आणि त्यांचे लिडर...

**मा. सभापती :-**

आत्ता काढू किंवा नाही?

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही लगेच काढायचे. तुम्ही उद्यापासून सुरु करा. पण त्यांना कॅश द्यायची नाही. पॉलिसी कोणती, जी एजन्सी आहे ती तुम्ही नक्की करायची. जेणेकरुन त्या कर्मचाऱ्यांचा फायदा होईल आणि त्या लोकांना तुम्ही पॉलिसी इश्यू करायच्या. तुम्ही पैसे इश्यू करु नका, चेक पण देउ नका, पॉलिसी द्या. हे पन्नास कर्मचारी आहेत, हजार कर्मचारी आहेत, मल्टीप्लाय अमुक अमुक. ते पेंमेट तुम्ही द्यायचे. हा दोन तीन लाखाचा खर्च येतो. हा माणूस पहिलाच इन्श्यूरन्स काढून उभा केला असता. तर हा भुर्दंड तुम्हांला पडला नसतो.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब आपले स्थायी कर्मचारी असतात. त्यांच्या नातेवाईकांना पण आपण हॉस्पिटलचे बिल देतो का?

**मिलन म्हात्रे :-**

तरतुद आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

कुटुंबाबाबत ही पॉलिसी आहे.

**एस. एस. खान :-**

कुटुंब म्हणजे काय?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

कुटुंब म्हणजे मिसेस, मुलगा इतर असतील ते

**प्रशांत पालांडे :-**

साहेब कोणाचा असा अर्ज आपल्याकडे आलेला आहे का? जवळचे नातेवाईक म्हणजे मुलगा, मिसेस यांना जवळचे नातेवाईक म्हणतो. आपल्याकडे असे अर्ज पेंडींग आहेत का?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब मागे मा. महासभेने तो विषय मांडला होता. ठराव केला होता की, श्री. विजय पाटील आणि श्री. राणे यांच्या कुटुबांच्या संदर्भामध्ये मग ते अजून कुठपर्यंत पेंडींग पडले आहे. त्यांना पैसे दिले की नाही?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

श्री. विजय पाटील आणि श्री. राणे यांच्याबाबत त्यांच्या फॅमिली घटकामध्ये जे काही आजार झाले होते किंवा त्यांच्या मेडीकल रिम्बर्समेंटचा विषय होता. तो मा. आयुक्तांनी निर्णय घ्यावा असे मा. महासभेच्या ठरावात आहे. त्याच्यामध्ये लेखाविभागाला ज्यावेळेस फाईल गेलेली आहे. तर ते परत निर्णयासाठी मा. महासभेला सादर करणार आहोत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महासभेने मा. आयुक्तांना अधिकार दिले आहेत, मग परत कशाला? साहेब, मा. महासभा मोठी की ऑडीटर मोठा?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा.) :-**

एकीकडे आपण रिम्बर्समेंट न देता ह्या पॉलिसी काढण्याचे धोरण करतो.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब ते नविन झाले.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ते आत्ता झाले.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा.) :-**

आपण त्यातच केलेला आहे.

**प्रशांत पालांडे :-**

हे आत्ता ह्या वर्षापासूनचे धोरण आहे. आम्ही याच्यापूर्वी झालेले बोलतो.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा.) :-**

ही जी रक्कम द्यायची आहे ती मागच्या वर्षीची आहे. धोरण झाल्या नंतरच्याच रक्कमा आहेत. काही लोकांनी अजून पॉलिसी काढलेल्या नाहीत. पण असे इन्सीडन्स येतात. म्हणून ते प्रकरण आहे.

**प्रशांत पालांडे :-**

पण त्या दोन बद्दल आपला ठराव झालेला आहे का?

**मा. सभापती :-**

आपण त्यांना देउ.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब म्हणाले की, परत मा. महासभेत येणार.

**मा. सभापती :-**

आपण शिपायाला देउ.

**शानु गोहिल :-**

श्री. विजय पाटील और श्री. राणे जो है, उनकी बात कर रहे है। उनका ठराव भी हुआ था। उनका ठराव होने के बावजुद भी पैसा क्यो नही दिया?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सभापती साहेब, मा. कमिशनर साहेब, एक गोष्ट सांगतो. जेव्हा महापालिकेत असे विषय मा. महासभेत किंवा मा. स्थायी समिती सभेत येतात. तेव्हा आपण भावनात्मक होउन सगळे निर्णय घेउन मोकळे होतो. मा. स्थायी समिती कोणाचे वाईट बघत नाही. मा. महासभा कोणाचे वाईट बघत नाही. एकमताने ठराव देतात की, ह्यांना पैसे द्या, त्यांना पैसे द्या. पण प्रशासन कधी आपली भुमिका कुठल्याही विषयावर स्पष्ट करत नाही की, महापालिकेला किती अधिकार आहे? श्री. विजय पाटील यांचा ठराव झाला. श्री. राणे यांचा ठराव झाला. मा. आयुक्तांनी अजुनपर्यंत आपली स्पष्ट प्रतिक्रिया दिलेली नाही. ठराव मान्य केला. चेक देता येत नाही. तर पुढच्या इतिवृत्तांतामध्ये आम्हाला त्याचा पुर्ण खुलासा केला पाहिजे की, या गोष्टी तुम्ही पास केलेल्या आहेत. आम्हाला करता येत नाहीत म्हणून आम्ही या ठिकाणी पाठवलेले आहे. अशा पद्धतीने मागच्या वेळी पत्रकारांना पन्नास हजार रूपये देण्याचा विषय मा. महासभेत होता. कोणाचाही विरोध नव्हता. पण महापालिकेमध्ये पास केला. उद्या कोणी त्याला नियमाच्या बाहेर गेलेले आहे. आणि त्याला अडचणीत आणले तर त्याला जबाबदार कोण? शेवटी सर्व ठिकाणी सहानुभुती चालत नाही. पैशांचा व्यवहार आहे. महापालिकेचा आर्थिक व्यवहार आहे. पण प्रशासन आपली भुमिका काहीच सांगत नाही. याचा पहिला खुलासा करावा. मागच्यावेळी मा. महासभेमध्ये पत्रकारांना पन्नास हजार दिले गेले. त्याआधी कुठलाही ठराव नाही. अशावेळी त्या पैशाला उद्या जर ऑडीटने आक्षेप घेतला. त्याला जबाबदार कोण? याचा पाहिल्यांदा खुलासा करावा. प्रत्येकवेळी आपण भावनात्मक विचार केला. याला पैसे द्या, दिले. याचा पाय तुटला दिले. तो मेला म्हणून द्यायचे आहेत पण शेवटी आपण पैसे देतो. उद्या ऑडीट आक्षेप काढला यांची काही भुमिका नसते. या प्रोसिडींगमध्ये पण प्रशासनाची काही भुमिका नाही. की, यांना देणे योग्य आहे की, नाही? या नियमाखाली आम्ही देउ शकतो की, नाही? काही नाही.

**प्रशांत पालांडे :-**

मा. महासभेमध्ये आपण विचारपुर्वक निर्णय घेतो. भावनेच्या आहारी जाउन कुठे घेतो?

**मिलन म्हात्रे :-**

त्यांचे म्हणणे आहे की, मा. आयुक्त जेव्हा टिपणी सादर करतात. त्यावेळेला त्यांनी सेक्शनवाईज कळवले पाहिजे की, या सेक्शनने मा. महासभेला पावर आहेत. या सेक्शनने मला पावर आहेत. कल्याण डोंबिवलीला दहा नगरसेवक जेलमध्ये गेले. निर्णय कोणाचा झाला? अधिकारी श्री. खतगांवकर बसले आहेत ते सरळ बोलणार या बॉडीने आम्हाला मंजुरी दिली आणि ऑडीटर बोलणार की, त्या मंजुरीनुसार आम्ही पेमेंट विड्रॉअल केले. जे मंजुरी देणारे जिम्मेदार आहेत. त्यांनी कायदे बघायचे. नगरसेवकाचा अर्थ असा आहे की, त्याला हा कायदा पुर्ण माहिती आहे. असे कायदा म्हणतो. बी.पी.एम.सी. ॲक्ट १९४९ आम्हाला सर्व माहिती

आहे म्हणून आम्ही नगरसेवक आहोत असे कायद्यामध्ये विधीलिखीत आहे. कोणीही अधिकारी आपल्या गळ्याला बांधून घेत नाहीत. ते सरळ सेक्शन लावून देउन टाकतात की, मंजुर केले आहे. विषय संपला.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मागच्यावेळी जेव्हा प्रस्ताव होता. तो प्रस्ताव नव्हता तो एक अर्ज होता. म्हणून कमिशनरसाहेब, आम्हाला पहिला या गोष्टीचा खुलासा केला पाहिजे. अशा पद्धतीने घेतलेल्या निर्णयाला प्रशासन किती जबाबदार आणि आम्ही किती जबाबदार आहेत?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

मा. महासभेने जे निर्णय घेतले ते महापालिकेला बंधनकारक असतात. त्यामध्ये जर बेकायदेशिर असेल तर मा. आयुक्त त्याची अंमलबजावणीच करत नाहीत.

**मिलन म्हात्रे :-**

ती अंमलबजावणी करायची नाही. त्यांनी विखंडीत करण्यासाठी पाठवायची आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

बेकायदेशिर असेल तर अंमलबजावणीच होत नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आत्तापर्यंत इकडे पास केलेले किती प्रस्ताव तुम्ही विखंडीत करायला पाठवले?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

तुम्ही एक मुद्दा बोलले, त्याचे मला उत्तर देउ द्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आत्ता तुम्ही बोलले की, विखंडीत करायला आम्ही पाठवून देतो.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

मी काय उत्तर सांगतो ते तुम्ही ऐकून तर घ्या. तुम्ही जो मुद्दा मांडलेला आहे की, मा. महासभेने जे निर्णय घेतले. त्याच्याबद्दल प्रशासनाची काय भुमिका असते. मा. महासभेने जे निर्णय करतात, प्रशासनाला कायद्याच्या कसोटीत ज्याची अंमलबजावणी करता येते, त्याचीच अंमलबजावणी होते. जी अंमलबजावणी केली जाउ शकत नाही, श्री. म्हात्रे साहेब म्हणाल्याप्रमाणे एकतर अंमलबजावणी होउ शकत नाही म्हणून त्याचे निर्णय कळवले जातात. किंवा ते शासनाला विखंडीत करण्यासाठी पाठवले जातात. उदाहरणार्थ तुम्ही जे सांगता की, अमुक लोकांना निधी देण्याबद्दल जे निर्णय झाले. ते महापालिकेच्या फंडातुन मा. महापौरांच्या माध्यमातुन जी विशेष तरतुद आहे. तेच निर्णय झालेले आहेत. आणि श्री. विजय पाटील आणि श्री. राणेंच्या बाबतीत विषय आहे. तो महापालिका फंडातुन असल्यामुळे त्याची रितसर चौकशी होउन तपासणी होउनच त्याची अंमलबजावणी होते. म्हणून आवश्यकता पडली तर विशेष बाब म्हणून तो विषय मा. महासभेला सुद्धा येउ शकेल. मा. आयुक्तांना वाटले की, मा. महासभेने याचा निर्णय घ्यायचा. हा प्रशासनाचा प्रस्ताव नव्हता.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. आयुक्त साहेब, आम्हाला सांगा आत्तापर्यंत आम्ही केलेले ठराव.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

एका विषयासाठी बोलू नका. जनरल बोलता येत नाही. आम्ही केलेले ठराव म्हणजे आम्ही काय समजायचे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही विखंडीत करायला पाठवता त्याची जाणीव आम्हाला दिली पाहिजे की नाही?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

काही आवश्यकता नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मग आम्ही त्याला काय समजायचे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

ते आपोआप समजते कुठे लपून राहते.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

असे कसे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

जे ठराव विखंडीत करायला दिलेले असतात ज्याची अंमल बजावणी होत नाही त्याची चर्चा होते.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ज्या मा. महासभेने पास केला आहे, ज्या मा. स्थायी समिती सभेने पास केला आहे आणि मा. आयुक्तांनी त्याला विखंडीत करण्यासाठी पाठवलेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मंत्रालयामधून मा. आयुक्तांना जी पत्र येतात. मा. आयुक्तांनी जे विखंडीत करण्याकरिता पाठवलेले आहे. त्याकरिता सचिव म्हणून तुम्हाला मंत्रालयातुन जी पत्र येतात की, सदरचा ठराव मा. आयुक्त यांनी.....

**प्रशांत पालांडे :-**

कमीत कमी इतिवृत्तांतामध्ये आम्हाला कळेल.

**मिलन म्हात्रे :-**

जरा प्रोसिजर ऐका. जरा बोलू द्या. ते सगळ्यांना बरोबर गुंडाळतात. मा. आयुक्तांना मंत्रालयातुन यु.डी्. सेक्रेटरीकडून पत्र येते. ते जे विखंडनाचे पत्र तुमच्याकडे येते. ते मा. आयुक्तांना आलेले पत्र आहे. ते तुम्ही पटलावर ठेवले पाहिजे. मा. आयुक्त ठराव पाठवतात की, सदर ठराव अमुक अमुक वन,टू,थ्री या कारणास्तव बेकायदेशिर आहे. किंवा महापालिकेचे नुकसान करणारा आहे किंवा एक्स वाय झेड जे त्या कलमामध्ये सेक्शन ४५१ मध्ये आहे ते. उद्या तो ठराव शासनाने रिजेक्ट केला तर तुम्हाला पत्र येते की, सदर ठराव हा रद्द झालेला आहे. त्याच्यावर कुठलीही कार्यवाही करण्यात येवू नये. तुम्ही ते पटलावर ठेवले पाहिजे.

**नगरसचिव :-**

असे पत्र अजुन आलेच नाही.

**प्रशांत पालांडे :-**

तो रद्द झाला हे ठिक आहे. पण तो विखंडीत झाला हे आपल्याला कळले पाहिजे की नाही?

**मिलन म्हात्रे :-**

विखंडीत केल्याचे तेच तर पत्र येते.

**प्रशांत पालांडे :-**

पत्र नंतर येते. तेवढा वेळ आपल्याला माहितीच पडत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

प्रश्नच नाही. ती प्रोसिजर असते.

**प्रशांत पालांडे :-**

विखंडीत केला आहे आणि शासनाकडे पाठवला आहे हे पण कळले पाहिजे की नाही?

**मिलन म्हात्रे :-**

हे बरोबर आहे. त्यांनी जी पाठवलेली पत्र आहेत ती पटलावर ठेवली पाहिजेत. ती आपण मागत नाही.

**प्रशांत पालांडे :-**

आम्हाला कळले पाहिजे.

**नगरसचिव :-**

ती पत्र सचिव कार्यालयात यायला पाहिजेत. ती आली नाहीत.

**मिलन म्हात्रे :-**

तुमची ही विषयपत्रिका काय म्हणते?

**मा. सभापती :-**

दुसरा विषय घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

आयुक्तांची पत्रे आणि कामकाज.

**प्रशांत पालांडे :-**

श्री. राणे आणि श्री. पाटील यांचे काय झाले

**मा. सभापती :-**

त्यांचा विखंडीत करायला गेलेला आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तो प्रस्ताव विखंडीत साठी पाठवलेलाच नाही.

**मा. सभापती :-**

ते माहिती पडेल पाठवलेला नसेल तर आपण मागून घेवू.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तो ठराव विखंडीत करण्यासाठी पाठवलेला नाही. तर त्याच्यावर प्रशासनाची काय भुमिका आहे?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सभापती साहेब, आत्ता श्री. खतगांवकर साहेब, बोलून गेले की, मा. महापौरांच्या फंडातुन पैसे देउ. मा. महापौरांना तो व्यक्तीगत फंड नाही. मा. महापौर फंड हा महापालिकेचा घटक आहे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मा. सभापती साहेब, आत्ता कर्मचाऱ्यांचा विषय निघाला म्हणून सांगते. आपला मा. स्थायी समितीचा एक ठराव आहे, प्रकरण क्र. २७, ठराव क्र. १८ पन्नास लिपिक ठेक्याने घेणे. तर तो विषय एकदा आणा. सात महिने झाले जे कामगार आपल्याकडे काम करतात त्यांना पगार नाही.

**प्रशांत पालांडे :-**

त्यांना असे सांगितलेले की, मा. आयुक्त नाहीत म्हणून निर्णय होत नाही. आत्ता मा. आयुक्त आले तर निर्णय झाला पाहिजे सात महिने ते लोक पगार नाही, काही नाही, असेच काम करतात.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

अधिकारी त्यांना पगार देत नाहीत, काम करून घेतात मग त्यांनी महापालिकेमध्ये फुकट मेहनत का करावी?

**प्रशांत पालांडे :-**

आत्ता मा. आयुक्त आलेले आहेत. त्यावेळी मा. आयुक्त नव्हते म्हणून निर्णय होत नव्हता.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

हा विषय श्री. बालाजी खतगावकर साहेब आल्यावर पुन्हा घेउ.

**शानु गोहिल :-**

उपरोक्त विषयानुसार कळविण्यांत येते कि, मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीमध्ये एस्कॉर्ट / पथकर नाके दि.०१/१०/०७ पासून चालू केले असून, सदर नाके तीन पाळयामध्ये महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्या मार्फत चालविण्यांत येतात दि.२२/०२/०८ रोजी पथकर नाका क्र.१ चेणागांव या ठिकाणी रात्रो ११ ते सकाळी ७ पर्यंत या रात्रपाळीमध्ये कामावर असलेले कर्मचारी श्री. अरुण चुरी यांचा अज्ञात वाहनाने पहाटे २.३० वाजताच्या दरम्यान ठोकर मारुन अपघात झाला असून रात्रीचा फायदा घेऊ न वहान निघुन गेलेले आहे. त्याबाबतची F.I.R. NO.I 67 दि.२३/०२/०८ रोजी काशिमिरा पोलिस स्टेशन, ठाणे येथे तक्रार दाखल केलेली आहे. त्याची सत्यप्रत सोबत जोडलेली आहे.

अपघाती कर्मचारी भाईंदर (पुर्व) "बालाजी हॉस्पीटल" मध्ये पुढील उपचारासाठी दाखल केलेला असुन, त्याच्या चार ठिकाणी फॅक्चर झालेले आहे. व उजव्या हाताला क्रॅश होउुन इतर ठिकाणी मार लागलेला आहे. डॉक्टरी सल्यानुसार अपघाती कर्मचाऱ्याला कमीत कमी पंचवीस दिवस उपचारासाठी हॉस्पीटल मध्ये ठेवावे लागणार आहे. त्यासाठी ऑपरेशन, औषधे, रक्त, सी.टी.स्क्रॅन, सोनोग्रॉफी, एक्सरे,प्लास्टर,ऑपरेशन चार्ज,बेड चार्ज,नर्सींग चार्ज इत्यादी मिळुन एकुण रु.१,२४,१८७/-(अक्षरी रु.एक लाख चोविस हजार एकशे सत्याअंशी मात्र) एवढा खर्च दि.२५/०२/०८ पर्यंत झाला आहे. व पुढील पाच ते सहा महीने उपचारासाठी अंदाजीत खर्च रु.१,२०,०००/-(अक्षरी एक लाख वीस हजार मात्र) एवढा लागणार आहे.एकुण रु.२,४४,१८७/- एवढा खर्च होणार आहे.सोबत हॉस्पीटलचे बील जोडलेले आहे.वरील प्रमाणे होण्याऱ्या खर्चास मा.स्थायी समिती सभा मंजुरी देत आहे. तसेच ३१ मार्च २००८ पूर्वी कर्मचाऱ्यांची मेडिक्लेम थकित रोख रक्कम देण्यात यावी.

**सुनिता पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर.

**मिलन म्हात्रे :-**

कुठला ठराव मंजुर केला? हा ठराव मा. महासभेत झालेला आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :**

त्यादिवशी तुम्ही मा. महासभेत कशाला घेतला.

**मा. सभापती :-**

मा. महासभा मे वो ठराव नही हुआ।

**शरद पाटील :-**

मा. उपायुक्त साहेब, तुम्ही नियम सांगा, ते योग्य आहे की, अयोग्य आहे. उद्या त्याला आम्ही जबाबदार का राहायचे?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

ती फक्त चर्चा झाली होती.

**शरद पाटील :-**

हा ठराव देणे योग्य आहे की, अयोग्य आहे याचा प्रशासनाने खुलासा करावा. त्याच्यानंतर याला मंजुरी मिळेल. याला आम्ही जबाबदार राहणार नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

याच्यावर मा. आयुक्त साहेबांनी आपली भुमिका स्पष्ट करावी. ते देता येते दिले पाहिजे, नाही दिले पाहिजे, आमचे अधिकार आहेत या फंडातून देउ शकतो हे स्पष्ट करावे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

प्रकरणामध्ये जकात विभागामध्ये कार्यरत कर्मचाऱ्याचे ॲक्सीडेंट झाले होते त्याला ट्रकने रात्री उडवलेले होते. त्याच्यामध्ये त्याच्या शरीराची खूप दुखापत होउन ते बालाजी हॉस्पिटलमध्ये ॲडमिट होता. ही माहिती आपणा सर्वांना त्यावेळेस चर्चेमध्ये होती आणि या अनुषंगाने मा. महासभेतसुद्धा चर्चा झाली होती. मा.

आयुक्तांनी अधिनियमाच्या तरतुदीमध्ये आणि कर्मचाऱ्यांच्या हक्कापोटी हा गोषवारा दिलेला आहे. आणि तो कायदेशिर आहे आणि सदर प्रकरणामध्ये ५०टक्के रक्कम मा. आयुक्तांनी संबंधित दवाखान्याला दिलेली आहे. तर त्याला मंजूर करणे योग्य राहिल.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, याच्यात आमचे म्हणणे असे आहे की ही जी कोण व्यक्ती जखमी झाली. साहेब आत्ता इलेक्ट्रीसीटी मध्ये काम करायचे आहे. समजा महापालिकेचा वायरमन आहे. त्याचा २४ तास इलेक्ट्रिकशी संपर्क आहे. ही व्यक्ती नाक्यावर उभी राहून वाहने अडवणार हे सत्य आहे. तो क्लार्क नव्हता. एकतर आपला जो एस्कॉर्ट तयार केला गेला. याला राज्य शासनाची मंजूरी नाही. आमचा त्या मुलाला वैद्यकीय मदत नाकारण्याचा इरादा नाही. मेहरबानी करुन असा गैरसमज कोणीही समजून घेउ नये. फक्त एवढेच आहे, आपल्याकडे सगळ्या तरतुदी आहेत. आज आम्ही आमचे स्वतःचे मेडिक्लेम काढून ठेवलेले आहेत. तुमच्याकडे काही कमी रक्कमेमध्ये, ह्या  दोन-तीन लाखामध्ये जवळ जवळ तुम्ही ऑक्ट्रॉय नाक्यावरच्या कर्मचाऱ्यांचा मेडिक्लेम काढू शकले असते. ॲक्सीडंट क्लेम काढू शकत होते. ते न करता अशी कोणती घाई केली होती. आत्ता तो माणूस जिवंत आहे. मेलेल्याचा जीव आपण पाच-दहा लाख रुपये खर्च करुन आणू शकत नाही. साहेब, ही जी प्रोसिजर आहे, त्याला आमचा विरोध आहे. म्हणजे आत्ता महापालिकेला हा भुर्दंड झाला. समजा त्याने तुमचे चार कर्मचारी उडवले असते. तर चार त्रिक बारा लाख झाला असता. आम्ही गेल्या मिटींगला सदस्य असतानापासून जसे भिवंडीला फायर ब्रिगेडचे नउ लोक स्पॉटवर आग विझवताना तिकडच्या तिकडे होरपळून मेले. आज आपल्या इकडे त्या कर्मचाऱ्यांनासुध्दा इन्श्युरन्स नाही आणि जेव्हा एखादा रिस्की जॉब करतो. तेव्हा त्याला तुम्ही संरक्षण द्या. हे न देता निर्णय झाला. आजही ते तिकडे रात्री काठी घेउन फिरतात. तिकडे धड स्पिड ब्रेकर नाही. तिकडे झेब्रा क्रॉसिंग नाहीत. आत्ता मुंबई पुणे हायवेला एक दोन किलोमिटर अगोदर पासुन त्यांचे बोर्ड लागतात की, इथे टोल आहे. जे भरणार, त्याला ट्रकचे किती किंवा कारचे किती? अशी आपल्याकडे ट्रकच्या ड्रायव्हरला मिळणारी इन्फॉरमेशन नाही. जो स्पॉट निवडला आहे, तिकडेसुद्धा ॲक्सीडंट होतात. आमची सुचना अशी होती की, दहिसरचा टोलनाका आहे. त्याच्याशी कोलॅबरेशन वगैरे करता येईल का ते तुम्ही बघा. तुम्ही त्याला भाडे नक्की करा की, आम्हांला हा टोलनाका पावत्यांकरीता वापरायला दे. कारण तो आमच्या जागेमध्ये आहे. आणि त्याच्याकडे जर आपली माणसे झाली. तर टोलचे जे काही २५ असतील ते तुमचे जे काही ५-५० असेल. जर तुम्हांला एकत्र मिळाले तर तुमचे जास्तीत जास्त उत्पन्न वाढेल. आज टोल नाक्यावर एकदाच गाड्या थांबतात. साहेब, मोठे-मोठे, १२-१२, १८-१८ चाकांचे ट्रेलर असतात. त्यांना एमर्जन्सी ब्रेक लावता येत नाहीत. मग ते गाड्या पुढे नेतात. याच्यावर तुम्ही या माध्यमातून काहीतरी धोरणात्मक निर्णय घ्या. आणि हे जे मेडिकलचे आहे. जर हॉस्पिटलचे व्यवस्थित बिल असेल तर आमची त्याला हरकत नाही. परंतु पुढे प्रिकॉशन घ्या. एक केस झाली त्यातून शिकण्यासारखे आहे. पुढे अशा केसेस होउ नये आणि महापालिकेला आर्थिक बोजा पडू नये.

**एस. ए. खान :-**

मा. आयुक्त साहेब, आपल्याकडे ते निष्काळजीपणा करतात आणि आपल्याकडे आणतात. मागे चौपाटीला असाच एक नागरिक मेला आणि आपल्याला पैसे द्यावे लागले.

**मा. आयुक्त :-**

महानगरपालिकेच्या सेवेमधील ज्या सेवा अत्यावश्यक आहेत. परंतु, हजार्डस, हजार्डस इन द सेन्स डेंजरस आहेत, त्या सेवेमधील कर्मचाऱ्यांचा सर्वच कर्मचाऱ्यांचा...

**मिलन म्हात्रे :-**

ते आत्ता ३१ तारखेला शेवटचे आहे. नाहीतर नंतर लॅप्स होईल. ते ह्या ३१ च्या अगोदर करुन घ्या. गेल्या वर्षाचे दिले गेलेले नाही. ते बाकी आहेत. किती बाकी आहेत?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

आपल्याकडे इन्श्युरन्स बाबत फाईल आहे. त्याच्यावर आपण निर्णय घेउ.

**मा. आयुक्त :-**

३१ पर्यंत होईल.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब ते जर ३१ ला झाले नाही. तर यांचे सगळ्यांचे लॅप्स होईल.

**मा. आयुक्त :-**

त्याच्या आधी करतो.

**मिलन म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब, तुमचे रुलिंग पाहिजे. ३१ मार्चला झाले पाहिजे. तर ते गेल्या वर्षाचे लॅप्स होणार नाही. साहेब मी विनंती करतो की तुमच्या रुलिंगमध्ये असे पाहिजे की ३१ तारखेपर्यंत जे बाधीत होणार आहेत. त्यांचे ३१ च्या अगोदर करा आणि जे नविन वर्षाचे २००८-०९ ते एप्रिलपासून सुरु करा, असे आपले रुलिंग पाहिजे.

**मा. सभापती :-**

पण ते आज काढल्यानंतर पूर्ण वर्षभर असते.

**मिलन म्हात्रे :-**

ते पुढच्या वर्षाचे गेल्या वर्षाचे केले नाही. ज्यांनी पॉलिसी काढल्या. वर्षभर बेनिफिट घेतले. त्यांचे पैसे आपण त्यांना देउ नये का?

**मा. सभापती :-**

त्यांना द्यायला सांगतो.

**शानू गोहिल :-**

मा. सभापती साहेब, सौ. महानंदा पाटील और श्री. राणे के बारे मे मा. महासभा मे ठराव हूआ था। उसको अभी तक इम्प्लिमेंट नही किया उसके बारे मे जरा स्पष्टीकरण करो। मा. आयुक्त साहेब, आपल्याकडे मा. महासभेत एक ठराव झालेला आपले कर्मचारी सौ. महानंदा पाटील आणि श्री. राणे यांचे हॉस्पिटलचे बिल होते. मा. महासभेत ठराव पण झालेला पण त्याचे इम्प्लिमेंटेशन झाले नाही. त्याचे जरा स्पष्टीकरण करा.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, याच्यात अशी सुचना आहे की, आपल्याला जे गेल्या वर्षीचे द्यायचे बाकी राहीले आहे ते मार्च अगोदर द्यावे आणि वर्ष २००८-०९ च्या पॉलिसी काढण्याकरिता ३१ मार्च नंतर त्या पॉलिसी काढाव्यात.

**मा. सभापती :-**

१५ एप्रिलपर्यंत कम्पलसरी काढून घ्याव्यात. याच्यापुढे आपण त्यांना कुठलीही नुकसान भरपाई देणार नाही. ठराव मंजुर.

**प्रकरण क्र. ६१ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या पथकर (एस्कॉर्ट) नाक्यावर कामावर असताना मोटार अपघात झालेल्या स्थायी कर्मचारी (शिपाई) यांचे हॉस्पीटलचे बिल अदा करणेबाबत.

**ठराव क्र. ४८ :-**

उपरोक्त विषयानुसार कळविण्यांत येते कि, मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीमध्ये एस्कॉर्ट / पथकर नाके दि.०१/१०/०७ पासून चालू केले असून, सदर नाके तीन पाळयामध्ये महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्या मार्फत चालविण्यांत येतात दि.२२/०२/०८ रोजी पथकर नाका क्र.१ चेणागांव या ठिकाणी रात्रो ११ ते सकाळी ७ पर्यंत या रात्रपाळीमध्ये कामावर असलेले कर्मचारी श्री. अरुण चुरी यांचा अज्ञात वाहनाने पहाटे २.३० वाजताच्या दरम्यान ठोकर मारुन अपघात झाला असून रात्रीचा फायदा घेऊ न वहान निघुन गेलेले आहे. त्याबाबतची F.I.R. NO.I 67 दि.२३/०२/०८ रोजी काशिमिरा पोलिस स्टेशन, ठाणे येथे तक्रार दाखल केलेली आहे. त्याची सत्यप्रत सोबत जोडलेली आहे.

अपघाती कर्मचारी भाईंदर (पुर्व) "बालाजी हॉस्पीटल" मध्ये पुढील उपचारासाठी दाखल केलेला असुन, त्याला चार ठिकाणी फॅक्चर झालेले आहे. व उजव्या हाताला क्रॅश होउन इतर ठिकाणी मार लागलेला आहे. डॉक्टरी सल्यानुसार अपघाती कर्मचाऱ्याला कमीत कमी पंचवीस दिवस उपचारासाठी हॉस्पीटल मध्ये ठेवावे लागणार आहे. त्यासाठी ऑपरेशन, औषधे, रक्त, सी.टी.स्क्रॅन, सोनोग्रॉफी, एक्सरे,प्लास्टर,ऑपरेशन चार्ज,बेड चार्ज,नर्सींग चार्ज इत्यादी मिळुन एकुण रु.१,२४,१८७/-(अक्षरी रु.एक लाख चोविस हजार एकशे सत्याअंशी मात्र) एवढा खर्च दि.२५/०२/०८ पर्यंत झाला आहे. व पुढील पाच ते सहा महीने उपचारासाठी अंदाजीत खर्च रु.१,२०,०००/-(अक्षरी एक लाख वीस हजार मात्र)एवढा लागणार आहे.एकुण रु.२,४४,१८७/- एवढा खर्च होणार आहे.सोबत हॉस्पीटलचे बील जोडलेले आहे.वरील प्रमाणे होण्याऱ्या खर्चास मा.स्थायी समिती सभा मंजुरी देत आहे. तसेच ३१ मार्च २००८ पूर्वी कर्मचाऱ्यांची मेडिक्लेम थकित रोख रक्कम देण्यात यावी.

**सुचक :- श्रीम. शानु गोहिल.** **अनुमोदक :- श्रीम. सुनिता पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ६२ श्रवण यंत्रावरील जकात कर माफ करणेबाबत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मागच्या वेळी जो ठराव झालेला आहे. त्या ठरावामध्ये आर्थिक आणि त्रैमासिक खर्चामध्ये आम्ही सुचना ॲड केलेली होती. ऑडीटला जो कोणी अधिकारी जबाबदार असेल त्याला धरून आम्ही ठराव केला. त्या ठरावाचा कुठेही उल्लेख झालेला नाही. सन्मा. सदस्य श्री. एस. ए. खान साहब, आपको हमने सुचना पढी वो इसमे ॲड नही हुआ है। त्रैमासिक खर्च का ऑडीट आक्षेप जो भी आयेगा वो उस डिपार्टमेंटका संबंधित अधिकारी जबाबदार रहेगा, ऐसा उस ठराव मे नही आया म्हणजे तुम्हाला काही बोलले, इकडे काही नाही. आम्ही एक एक ओळ वाचायची.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

या परिपत्रकानुसार आम्ही कार्यवाही करणार होतो.

**मिलन म्हात्रे :-**

परिपत्रकाचा उल्लेख तो प्रश्न नाही. तुम्हाला परत सांगतो टाकायचे तर टाका नाही तर नका टाकू, मला फरक पडत नाही. माझी श्रवण यंत्राची फॅक्टरी नाही. १ नोव्हेंबर २००७ पासूनचा बॅक इफेक्ट टाकायला लागेल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सभापती साहेब, आमची सुचना ॲड करायला पाहिजे. त्रेमासिक खर्चामध्ये आम्ही सुचना केली होती. तुम्ही मान्यपण केली होती.

**मिलन म्हात्रे :-**

श्री. पानपट्टे साहेब, नियम १५२ (क) काय बोलतो? याच्यात त्यांनी उपकराला सुट दिली आहे. सेक्शन एकदम क्लिअर आहे. विविक्षित माल उपकरातुन सुट मिळण्यास पात्र नसणे याच्यामध्ये सुट मिळण्यासाठी पात्र नाही असे सेक्शन म्हणतो. याच्यात तुम्ही "क" टाकला आहे. म्हणजे आम्ही काय अर्थ पकडायचा. जरा सेक्शन बरोबर वाचा. त्या पत्रामध्ये त्यांनी "क" दिलेला आहे. १५२ (क) पान नं. २३० काढा.

**नगरसचिव :-**

१५२ (क) मी वाचून दाखवतो.

**मिलन म्हात्रे :-**

पुर्ण वाचून दाखवा.

**नगरसचिव :-**

नियम १५२ "क" विविक्षित माल उपकरापासुन सुट मिळण्यास पात्र नसणे (१) अनुसुचि ब मध्ये विनिर्दीष्ट केलेल्या मालावर कोणताही उपकर बसविता येणार नाही (२) अनुसुची क मध्ये विनिर्दीष्ट केलेल्या मालापैकी कोणत्याही मालासमोर कोणत्याही शर्ती, निर्बंध किंवा अपवाद नमुद केलेले असल्यास त्या शर्थी, निर्बंध किंवा अपवाद यांच्या आधीन राहून त्या मालावर उपकर देण्यास सुट मिळेल. परंतु, (असे की, महापालिकेच्या ज्या राज्य शासनाच्या पुर्व मंजुरीला आधीन राहून राजपत्रातील अधिसुचनेद्वारे अनुसुची ब आणि क मध्ये कोणत्याही नोंदी दाखल करता येतील त्यात बदल करता येतील किंवा त्या वगळता येतील. परंतु आणखीन असे की, अशी अधिसुचना पुर्व प्रसिद्धी करून लोकांकडून मागविण्यात आलेले आक्षेप व सुचना असल्यास त्या विचारात घेतल्यानंतर अशी अधिसुचना प्रसिद्ध करण्यात येईल.) २) या प्रकरणान्वये प्रकरण उपकर भरल्यास पात्र असलेल्या प्रत्येक व्यापारी व प्रकरणाच्या व नियमाच्या तरतुदी नुसार उपकर भरील.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

ते फक्त नवी मुंबईशीच लागू आहे. जकाती ऐवजी उपकर म्हणून ते सेक्शन आहे.

**मिलन म्हात्रे :-**

त्यांनी जकात/उपकर असे म्हटले आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

तो वरचा पॅरेग्राफ खास नवी मुंबईसाठी उल्लेख केलेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

जकात हा आपल्यामध्ये आणि उपकर नवी मुंबईला आहे. म्हणजे जकात हा शब्द नसता तर आपल्याकडे हा विषयपण आला नसता. ह्याच्यामध्ये माझी अशी सुचना आहे. दोनचा एक तुम्ही ठरावमध्ये नमुद करून घ्या. कारण त्यांनी वर क रिफ्लेक्ट केला आहे. अनुसुची ब बोलतात पण तुम्ही २(१) कोट करून ठराव करून घ्या. १५२ (क) मधील २(१) ठरावामध्ये अंतर्भुत करा आणि मग ठराव घ्या. त्याच्यामध्ये टेक्निकल मुद्दा काय आहे तो बघितला का? त्याच्यात २१ नोव्हेंबर २००७ ही तारीख टाका. आपला ठराव २००८ मध्ये असला तरी तुम्हाला २००७ पासुन इफेक्ट द्यावा लागणार आहे. सदर कार्यवाही अंमलात आली पाहिजे. त्यापासुनचा परतावा तुम्हाला त्याच्यात परतावा द्यावा लागणार आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

साहेब, अंमलबजावणी म्हणजे त्याच्यामध्ये आले.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, तुम्ही परतावा हा शब्द टाका २१ नोव्हेंबर २००७ पासून अंमलबजावणी करून परतावा द्यावा असा त्याच्यात शब्द पाहिजे. ठराव आम्ही करणार मग तुम्ही त्याच्यात वाद कशाला घालता? आम्हाला जे योग्य वाटते ते आम्ही करतो उगाच कशाला फुकटचे फाटे फोडता?

**एस. ए. खान :-**

महाराष्ट्र हे कल्याणकारी व देशातील प्रगत राज्य असुन , राज्यातील अपंगाच्या कल्याणासाठी विविध योजना कार्यरत केलेल्या आहेत. राज्यातील काही महानगरपालिका मध्ये (बृहन्मुंबई,कल्याण डोंबिवली,मालेगांव) श्रवण यंत्रावर जकातकर आकारला जात नाही. श्रवण यंत्र हे कर्णबधीरांकरिता वापरण्याचे महत्वाचे साधन आहे. श्रवण यंत्राची आवश्यकता असलेल्या अपंगाची संख्या नगण्य असल्याने,श्रवणयंत्र हया मालावर महाराष्ट्र राज्यपाल हयांच्या आदेशवरुन शासन निर्णयानुसार जकातकर/उपकर भरणे बाबत माफी दिलेली आहे.

महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक संकिर्ण १००६/ प्रक्र२१२/०६/नवि-२ नगर विकास विभाग, मंत्रालय दि.२३ऑक्टोबर २००७ च्या आदेशानुसार कर्णबधीरांकरिता वापरण्यांत येणारे महत्वाचे साधन 'श्रवण यंत्र' या मालावर जकात कर / उपकर माफ करावा. व त्या दृष्टीने आवश्यक ती पुढील कार्यवाही महानगरपालिकांनी त्वरित करावी असे निर्देश देण्यांत आलेले आहेत. जकात संपेपर्यंत.

वरील वस्तुस्थितीचा विचार करुन अपंगाची संख्या नगण्य असल्याने तसेच 'श्रवण यंत्र' हे कर्णबधीरांकरिता महत्वाचे साधन असल्यामुळे वेळोवेळी प्रोत्साहीत करण्याचे शासनाचे धोरण विचारात घेता. 'श्रवण यंत्र' या मालावर संपूर्णपणे जकात कर / उपकर माफी ही सभा देत आहे. दि. २१ नोव्हेंबर २००७ पासून सदरची अंमलबजावणी करावी व परतावा द्यावा व तसेच बी.पी.एम.सी. ॲक्ट १५२(क) २ च्या नुसार कार्यवाही करावी.

**मिलन म्हात्रे :-**

ही जकात संपेपर्यंत लिहा. आत्ता हा ठराव इन्फोर्समध्ये जकात चालू आहे तोपर्यंत राहणार. जकात ब्रेक अप झाली आणि सहा महिन्याने परत चालू झाली. तर तुमचा आत्ता जो घेतलेला निर्णय आहे तो कायमचा नाही. म्हणून जकात संपेपर्यंत हा शब्द त्याच्यात टाका म्हणजे तुम्हाला परत परत ठराव करण्याची गरज नाही.

**शानु गोहिल :-**

माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. ६२ :-**

श्रवण यंत्रावरील जकात कर माफ करण्याबाबत.

संदर्भ :- शासन निर्णय क्रमांक संकिर्ण १००६/ प्रक्र२१२/०६/नवि-२ नगर
विकास विभाग, मंत्रालय दि.२३ ऑक्टोबर २००७ चे पत्र.

**ठराव क्र. ४९ :-**

महाराष्ट्र हे कल्याणकारी व देशातील प्रगत राज्य असुन , राज्यातील अपंगाच्या कल्याणासाठी विविध योजना कार्यरत केलेल्या आहेत. राज्यातील काही महानगरपालिका मध्ये (बृहन्मुंबई, कल्याण-डोंबिवली, मालेगांव) श्रवण यंत्रावर जकातकर आकारला जात नाही. श्रवण यंत्र हे कर्णबधीरांकरिता वापरण्याचे महत्वाचे साधन आहे. श्रवण यंत्राची आवश्यकता असलेल्या अपंगाची संख्या नगण्य असल्याने,श्रवणयंत्र हया मालावर महाराष्ट्र राज्यपाल हयांच्या आदेशवरुन शासन निर्णयानुसार जकातकर/उपकर भरणे बाबत माफी दिलेली आहे.

महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक संकिर्ण १००६/ प्रक्र२१२/०६/नवि-२ नगर विकास विभाग, मंत्रालय दि.२३ऑक्टोबर २००७ च्या आदेशानुसार कर्णबधीरांकरिता वापरण्यांत येणारे महत्वाचे साधन 'श्रवण यंत्र' या मालावर जकात कर / उपकर माफ करावा. व त्या दृष्टीने आवश्यक ती पुढील कार्यवाही महानगरपालिकांनी त्वरित करावी असे निर्देश देण्यांत आलेले आहेत.

वरील वस्तुस्थितीचा विचार करुन अपंगाची संख्या नगण्य असल्याने तसेच 'श्रवण यंत्र' हे कर्णबधीरांकरिता महत्वाचे साधन असल्यामुळे वेळोवेळी प्रोत्साहीत करण्याचे शासननाचे धोरण विचारात घेता. 'श्रवण यंत्र' या मालावर संपूर्णपणे जकात कर / उपकर माफी ही सभा देत आहे. दि. २१ नोव्हेंबर २००७ पासून सदरची अंमलबजावणी व परतावा द्यावा व तसेच बी.पी.एम.सी. ॲक्ट १५२(क) २ च्या नुसार कार्यवाही करावी.

**सुचक :- श्री. एस. ए. खान** **अनुमोदक :- श्रीम. शानु गोहिल.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मा. सभापती साहेब, माझा एक विषय राहीला आहे. मा. स्थायी समितीमध्ये आपला ठराव झाला होता. प्रकरण क्र. २७, ठराव क्र. १८ त्याच्यामध्ये आपण ठेक्याने ५० लिपिक घेणार होतो. तो ठेका रद्द झाला आहे. आत्ता आपल्याला पुन्हा ठेक्याने घ्यायचे आहे. मा. आयुक्त येणार होते म्हणून तो विषय पेंडींग राहीला आहे. ते ठेक्यावरचे लिपिक सात महिने झाले आपल्याकडे कार्यरत आहेत, काम करतात. पण त्यांना सात महिन्यापासून पगार नाही. मग त्यांनी कुठल्या आधारावर आपल्याकडे काम करावे. ते घ्यायचे किंवा नाही याच्याबद्दल तुम्ही काहीतरी पॉलिसी ठरवा.

**मा. आयुक्त :-**

मी नविन असल्यामुळे मी हे प्रकरण बघुन घेतो. आणि मग आपल्याला सांगतो.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

साहेब, तुम्ही बघुन घ्या आणि त्याच्यावर लवकर योग्य तो निर्णय घ्या. कारण ते सात महिने काम करतात. त्यांना पगार देत नाहीत.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब, अजुन एक विचारायचे आहे. आपण बजेटमध्ये होते आणि आपल्याला त्याचवेळी कळले की, ऑक्ट्राय जाते. तर एक थोडीशी माहिती द्या की, आपल्याकडे अल्टरनेट काय आहे.

**मा. आयुक्त :-**

जुनपर्यंत ठेका कायम राहील. त्याच्याबद्दल काळजी करण्याचे काही कारण नाही. आणि मध्यंतरीच्या काळात शासनाशी संपर्क साधून काय काय प्रक्रिया करता येतील ते आपण ऑलरेडी सुरू केलेले आहे.

**प्रशांत पालांडे :-**

कसे असेल? दुसरा इन्कम सोर्स काय असेल?

**मा. आयुक्त :-**

त्यांनी सेस लावतात. आम्ही नवी मुंबईला जावून बघून येतो. त्याप्रमाणे करायचे आहे.

**प्रशांत पालांडे :-**

आपल्याला ते ऑप्शन आहेत की, ते सांगणार तसे करावे लागणार.

**मा. आयुक्त :-**

ते सांगतील, आपण बजेटमध्ये जे अनाउन्स केले त्या अनुषंगाने शासन जी.आर. निघेल. त्याची आपण वाट बघतो आहोत. मध्यंतरी आम्ही शासनाच्या संपर्कात आहोत.

**प्रशांत पालांडे :-**

ऑप्शनल नाही ना? ते सांगणार तसे करावे लागेल?

**मा. आयुक्त :-**

ऑप्शनल नसेल.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मा. आयुक्त साहेब, शहरामध्ये अनधिकृत बांधकामांचा सुळसुळाट झाला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब माझी सुचना अशी होती की, तुम्ही सेसचे जे कलेक्शन कराल त्याच्यामध्ये बी.ओ.टी. वर काही देता येते का?

**मा. आयुक्त :-**

तो विचार आम्ही ऑलरेडी सुरू केलेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

कारण अधिकाऱ्यांकडून तुमची वार्षिक कर वसुली, पाणीपट्टी वसुली होत नाही.

**मा. आयुक्त :-**

तुमच्या मताशी मी सहमत आहे. पण मी एकटा सहमत असून उपयोग नाही, जनरल बॉडी सहमत झाली पाहिजे आणि शासनाचे काय धोरण होते हे ही आपण बघू या. आपण बी.ओ.टी. वर भविष्यात द्यायचे असेल तर असे आक्षेप येतात, म्हणजे अशी ऑलरेडी कुणकुण सुरू आहे, माझ्याकडे रिप्रेझेंटेशन येतात की, मग हे व्यापारी आहेत त्यांना त्रास देतील.

**मिलन म्हात्रे :-**

पण त्याचा उलटा परिणाम काय? माझ्या वॉर्डमध्ये एखादी मोठी कंपनी आहे. त्याचे सेस समजा १० लाख होतो. तुमचे अधिकारी गेले. मी जाउन बसलो की, याच्यात पाचमध्ये करायचे. कारण आत्ता बऱ्याच वेळेला होते. तर तसा राजकिय हस्तक्षेप होउन आपल्या वसुलीवर फरक पडतो.

**मा. आयुक्त :-**

वृत्त देणे सगळ्यात चांगली गोष्ट आहे यात वादच नाही.

**मिलन म्हात्रे :-**

सध्या आमच्या दोन केस चालू आहेत.

**मा. आयुक्त :-**

पण कायम स्वरूपी असा हा ठेका देणे. त्यामध्ये ठेकेदाराकडून भविष्यात व्यापाऱ्यांची होणारी पिळवणूक वाचविण्यासाठी आपण काही अटी ठेवू जेणेकरून आपलाही महानगरपालिकेचा सेस बुडणार नाही आणि ते लोक व्यापाऱ्यांची सुद्धा जास्त पिळवणूक करणार नाहीत.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, पिळवणूक तर होणारच नाही. सरळ बिल टू बिल आहे. आत्ता एक्साइजचे मटेरियल सर्वात कॉस्टली असते. एक किलो सात आठ लाखाचे केमिकल आहे.

**मा. सभापती :-**

या सभेला उपस्थित असलेले सर्व सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी वर्ग, यांनी आजची ही सभा खेळीमेळीच्या वातावरणारत पार पाडण्यास सहकार्य केले. त्याबद्दल मी सर्वांचे आभार मानतो आणि आजची सभा संपली असे मी जाहिर करतो.

**सभा संपल्याची वेळ :- सकाळी. ११.५५ वा.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**